D:\Som2\Dept./Adm Ser.TY syllabus 1.p65 6

# Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded

## B.A. In Administrative Service (CBCS Pattern)

## Third Year ( Sem. V)

राज्यशास्त्र

मानवी हक्क

**Paper No. : AS 35**

**Credit : 03** **Periods : 50** **Marks: 75**

---

**अभ्यासक्रमाची उदिष्टये:**

01. भारतीय लोकशाहीमध्ये विद्यार्थ्यांना मानवी हक्काविषयी माहिती करुन देणे.
02. मानवी जिवनातील आंतराष्ट्रीय मानके, संविधानातील प्रतिबिंब, भारतातील मानवी हक्काची चळवळ, यांचा परीचय करुन देणे.
03. मानवी हक्कातील बालविकास, महिला विकास, युवकांचा विकास,आदिवासी विकास, वंचित वर्गाचा विकास, वयोवृध्द लोकांचा विकास, कामगार कल्याण, विकलांग व्यक्तीचे कल्याण, लोकांचे पुर्नवसन इत्यादी घटकाची माहिती करुन देणे.
04. स्पर्धा परीक्षेची तयारी करुन घेणे.

**निष्पत्ती :**

01. विद्यार्थ्यामध्ये मानवी हक्काविषयी जनजागृती निर्माण होईल.
02. मनवी हक्कातील बालविकास, महिला विकास, युवकांचा विकास अदिवासी विकास, वंचीत वर्गाचा विकास, वयोवृध्द लोकांचे कल्याण, कामगार कल्याण, विकलांग व्यक्तीचे कल्याण, लोकांचे पुनर्वसन, आंतरराष्ट्रीय व प्रादेशिक संघटना यासह संरक्षण मूल्य व नीतीशिलतेचा विद्यार्थ्यांना परिचय होईल.
03. मानवी हक्कातील सर्व संकल्पना विद्यार्थ्यांना समजतील.
04. विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनामध्ये समाजात व्यवहार करताना मानवी हक्का विषयी माहिती होईल.
05. विविध स्पर्धा परीक्षेंत येणारे मानवी हक्काविषयीचे प्रश्न सोडवता येतील.

**अभ्यासक्रम घटक**

**1. मानवी हक्काचे स्वरुप: जागतिक मानवी हक्क प्रतिज्ञापत्र ( युडीएचआर 1948 )** मानवी हक्काची आंतरराष्ट्रीय मानके , त्याचे भारताच्या संविधानातील प्रतिबिंब, भारतात मानवी हक्क राबविण्याची आणि त्याचे संरक्षण करण्याची यंत्रणा, भारतातील मानवी हक्क चळवळ, मानवी हक्कापासून वंचित असलेल्यांच्या समस्या जसे गरिबी निरक्षरता, बेरोजगारी सामाजिक सांस्कृतिक धार्मिक प्रथा, हिंसा, भ्रष्टाचार, दहशतवाद, कामगारांचे शोषण, हवालतीतील गुन्हेगारी इत्यादी, लोकशाहीत मानवी हक्क आणि मानवी सभ्यतेचे पालन करण्यासाठी प्रशिक्षण देण्याची गरज, जागतिकीरण आणि त्याचा विभिन्न क्षेत्रांवरील परिणाम, मानवी विकास निर्देशांक बालमृत्यू प्रमाण, लिंग गुणोत्तर.

**2. बाल विकास** - समस्या व प्रश्न, अर्भक मृत्युसंख्या, कुपोषण, बाल कामगार मुलांचे शिक्षण इत्यादी शासकीय धोरणे, कल्याण योजना आणि कार्यक्रम - आंतरराष्ट्रीय अभिकरणे, स्वयंसेवी संघटना, सामूहिक साधने यांची भूमिका, लोककल्याणामध्ये लोकांचा सहभाग.

**3. महिला विकास** - समस्या व प्रश्न, स्त्री- पुरुष असमानता, महिलांविरोधी हिंसाचार, स्त्री अर्भक हत्या / स्त्रीभ्रूण हत्या, महिलांचे सबलीकरण इत्यादी शासकीय धोरण विकास / कल्याण व सबलीकरण यासाठीच्या योजना व कार्यक्रम आंतरराष्ट्रीय संस्था, स्वयंसेवी संघटना यांची भूमिका आणि सामूहिक साधने , लोकविकासातील लोकांचा सहभाग.

**4. युवकांचा विकास** - समस्या व प्रश्न (बेरोजगारी असंतोष अंमली पदार्थांचे व्यसन इत्यादी) - शासकीय धोरण - विकास योजना व कार्यक्रम - आंतरराष्ट्रीय संस्था, स्वयंसेवी संघटना यांची भूमिका आणि सामूहिक साधने, लोकविकासातील लोकांचा सहभाग.

**5. आदिवासी विकास** - समस्या व प्रश्न ( कुपोषण अलिप्तता, एकात्मीकरण व विकास इत्यादी- आदिवासी चळवळ- शासकीय धोरण, कल्याण योजना व कार्यक्रम - आंतरराष्ट्रीय संस्था, स्वयंसेवी संघटना संस्था, स्वयंसेवा संघटना व साधन संपत्ती संघटित करुन कामी लावणे व सामूहिक सहभाग.

**6. सामाजिकदृष्ट्या वंचित वर्गाचा विकास** - अ.जा., अ.ज, वि.जा. / भ.ज, इतर मागासवर्ग इत्यादी) - समस्या व प्रश्न संधीतील असमानता इत्यादी शासकीय धोरण, कल्याण योजना व विकास कार्यक्रम, आंतरराष्ट्रीय संस्था, स्वयंसेवा संघटना व साधन संपत्ती संघटित करुन कामी लावणे व सामूहिक सहभाग, विकासविषयक कार्यक्रमांमध्ये त्यांच्या सेवांचे उपयोजन.

**7. वयोवृध्द लोकांचे कल्याण** - समस्या व प्रश्न - शासकीय धोरण- कल्याण योजना व कार्यक्रम, आंतरराष्ट्रीय संस्था, स्वयंसेवी संघटना यांची भूमिका आणि वयोवृदांच्या विकासासाठी सामूहिक सहभाग, विकासविषयक कार्यक्रमांमध्ये त्यांच्या सेवांचे उपयोजन.

**8. कामगार कल्याण** - समस्या व प्रश्न - कामाची स्थिती, मजुरी, आरोग्य आणि संघटित व असंघटित क्षेत्राशी संबंधित समस्या, शासकीय धोरण, कल्याण योजना व कार्यक्रम - आंतरराष्ट्रीय संस्था, समाज व स्वयंसेवी संघटना.

**9. विकलांग व्यक्तीचे कल्याण** - समस्या व प्रश्न ( शैक्षणिक व रोजगार संधी यामधील असमानता इत्यादी ) शासकीय धोरण , कल्याण योजना व कार्यक्रम - रोजगार व पुनवर्सन यामधील आंतरराष्ट्रीय संस्था, स्वयंसेवी संघटना यांची भूमिका.

**10. लोकांचे पुनर्वसन** ( विकास प्रकल्प व नैसर्गिक आपत्ती यामुळे बाधित लोक ) - कार्यतंत्र धोरण व कार्यक्रम - कायदेविषयक तरतुदी - आर्थिक, सांस्कृतिक सामाजिक मानसशास्त्रीय इत्यादींसारख्या निरनिराळ्या पैलूंचा विचार.

**11. आंतरराष्ट्रीय व प्रादेशीक संघटना** - संयुक्त राष्ट्रे आणि तिची विशेषीकृत अभिकरणे- युएनसीटीएडी, युएनडीपी, आयसीजे, आयएलओ, युनिसेफ युनेस्को, युएनसीएचआर, इयु, ॲपेक, एशियन, ओपेक, ओपेक, ओएयु, सार्क, नाम, राष्ट्रकुल राष्ट्रे (कामनवेल्थ ऑफ नेशन्स ) आणि युरोपियन युनियन.

**12. ग्राहक संरक्षण** - विद्यमान अधिनियमाची ठळक वैशिष्ट्ये - ग्राहकाचे हक्क - ग्राहक विवाद व निवारण यंत्रणा, लवादांचे निरनिराळे प्रकार - उद्दिष्ट्ये, अधिकार, कार्ये, कार्यपध्दती, ग्राहक कल्याण निधी.

**13 मूल्ये व नीतीतत्त्वे** - कुटुंब धर्म, शिक्षण, प्रसारमाध्यमे इत्यादी यांसारख्या औपचारिक व अनौपचारिक संस्थामार्फत सामाजिक मानके, मूल्ये, नीतीतत्त्वे यांची जोपासना करणे.